# ****सूचना***

## शासकीय वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना प्रवेश अर्ज भरण्यास मुदतवाढीबाबत.

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, कोल्हापूर यांच्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता विविध कल्याणकारी योजनांचे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत आपले अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत.

योजनांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

- **शासकीय वसतिगृह योजना:** OBC, VJNT, SBC व EWS प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी. (लाभ: दरमहा भोजनभत्ता रु. ४५००, निर्वाहभत्ता रु. ६०० व मुलींना स्वच्छता साधने भत्ता रु. २००)
- **ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना:** OBC, SBC तसेच VJNT (NT-C वगळून) प्रवर्गातील कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी. (लाभ: रु. ३८,००० ते रु. ४३,०००)
- **पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना:** NT-C प्रवर्गातील कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी. (लाभ: रु. ३८,००० ते रु. ४३,०००)

महत्त्वाच्या सूचना:

१. नवीन प्रवेश घेतलेल्या तसेच पूर्ववत लाभ घेत असलेल्या (नूतनीकरण/Renewal) सर्व पात्र विद्यार्थ्यांनी मुदतीपूर्वी अर्ज भरणे अनिवार्य आहे.

२. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी अधिकृत पोर्टल **https://hmasnew.mahait.org/** या पोर्टलचा वापर करावा.

३. **सदर योजनेंचा लाभ घेण्याकरिता सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना Online प्रवेश अर्ज भरण्याकरिता https://hmasnew.mahait.org/ या पोर्टलवर (टॅब) उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.**

मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही आणि आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वतः जबाबदार राहतील, याची कृपया नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी महाविद्यालयाच्या संबंधित विभागाशी संपर्क साधावा.

| अ. क्र. | योजना | प्रवर्ग | तालुका क्षेत्रातील सर्व महाविद्यालये | कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व महाविद्यालये | लाभ |
|---|---|---|---|---|---|
| १. | शासकीय वसतिगृह | OBC, VJNT, SBC व EWS | लागू नाही | सर्व महाविद्यालये | तालुका: लागू नाही<br>जिल्हा: मुलां व मुलींना दरमहा भोजनभत्ता-4500, निर्वाहभत्ता-600 तसेच मुलींना स्वच्छता साधने भत्ता-200 |
| २. | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना | OBC, SBC तसेच VJNT (NT-C वगळून) | सर्व महाविद्यालये | कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेश मिळाला नाही ते विद्यार्थी व विद्यार्थीनी | रु.38000 (तालुका) / रु.43000 (जिल्हा) |
| ३. | पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना | NT-C | सर्व महाविद्यालये | कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेश मिळाला नाही ते विद्यार्थी व विद्यार्थीनी | रु.38000 (तालुका) / रु.43000 (जिल्हा) |

सोबतचे सदरचे **महाराष्ट्र शासन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, कोल्हापूर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विचारे माळ, कोल्हापूर.** दिनांक:- ०७/०९/२०२६. जा.क्र.ससंइमाबको/शावगृह /आधार-स्वयंम/२०२६-२७/१७२५ यांचे पत्र.

दिनांक: ०८/०९/२०२६

SHIVAJI UNIVERSITY School of Engineering & Technology, Kolhapur.

I/C Director
School of Engineering & Technology,
Shivaji University, Kolhapur

महाराष्ट्र शासन

# सहायक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण,कोल्हापूर.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विचारे माळ, कोल्हापूर.

E-mail:-adobckolhapur@gmail.com

जा.क्र.ससंइमाबको/शावगृह/आधार-स्वयंम/२०२६-२७/१७२४ दिनांक:- ०८/०९/२०२६.

प्रति,

**प्राचार्य,**

शिवाजी विद्यापीठ,

ता. करवीर,

जि.कोल्हापूर.

**विषय :- राज्यातील इतर मागास प्रवर्ग,विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह,ज्ञानज्योती सावित्रीबाई आधार योजना व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेतंर्गत प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आलेली असून त्याबाबतचा आपल्या स्तरावरून प्रचार व प्रसिध्दी करणेबाबत..**

**संदर्भ** :-१.इतर मागास बहुजन कल्याण विभाग,शासन निर्णय क्र.वगृयो२०२२/प्र.क्र.११/योजना ५ दिनांक:१३ डिसेंबर २०२३

२.इतर मागास बहुजन कल्याण विभाग,शासन निर्णय क्र.स्वयंम २०२३/प्र.क्र.३६८/ योजना दिनांक:२१ जून २०२४.

३.इतर मागास बहुजन कल्याण विभाग,शासन निर्णय क्र.वगृयो२०२२/प्र.क्र.११/योजना ५ दिनांक:११ मार्च २०२४

४.या कार्यालयाचे पत्र क्र.१५८७ दिनांक:१७.०८.२०२६

५.या कार्यालयाचे पत्र क्र.१६६५ दिनांक:०२.०९.२०२६

६.मा.संचालक,इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र.4924 दि.01.09.2026

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ ते ३ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील इतर मागास प्रवर्ग,विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी योजना खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | योजना | प्रवर्ग | तालुका क्षेत्रातील सर्व महाविद्यालये | कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व महाविद्यालये | लाभ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | तालुका | जिल्हा |
| १. | शासकीय वसतिगृह | OBC,VJNT,SBC व EWS | लागू नाही | सर्व महाविद्यालये | लागू नाही | मुलां व मुलींना दरमहा भोजनभत्ता-4500,निर्वाहभत्ता-600 तसेच मुलींना स्वच्छता साधने भत्ता-200 |
| २. | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना | OBC, SBC तसेच VJNT (NT-C वगळून) | सर्व महाविद्यालये | कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेश मिळाला नाही ते विद्यार्थी व विद्यार्थीनी | रु.38000 | रु.43000 |
| ३. | पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना | NT-C | सर्व महाविद्यालये | कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेश मिळाला नाही ते विद्यार्थी व विद्यार्थीनी | रु.38000 | रु.43000 |

सदर योजनेंचा लाभ घेण्याकरिता सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना Online प्रवेश अर्ज भरण्याकरिता https://hmasnew.mahait.org/ या पोर्टलवर (टॅब) उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

संदर्भ क्र.४ च्या पत्रान्वये कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व वर्तमानपत्रामधून शासकीय वसतिगृह, इतर मागास प्रवर्ग,विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना तसेच भटक्या जमाती क प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचे अर्ज भरणेसाठी प्रसिध्दी देण्यात आली होती.

तसेच संदर्भ क्र.५ च्या पत्रान्वये आपल्या महाविद्यालयात प्रवेशित असणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना तसेच भटक्या जमाती क प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेसाठी अर्ज करणेबाबत सूचना देण्यात आल्या असून अद्याप आपल्या महाविद्यालयातून शासकीय वसतिगृह,आधार व स्वयंम या योजनेंसाठी अर्ज प्राप्त झालेले नाहीत. विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला नाही तर विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होऊ शकते.तरी सदर योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांनी पुनश्चः नुतनीकरणाचे अर्ज भरणेसाठी सुचना देण्यात याव्यात.

त्यानुषंगाने संदर्भ क्र.६ च्या पत्रान्वये आपल्या महाविद्यालयात प्रवेशित असणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर योजनेसाठी अर्ज करणेसाठी **दि.१५.०९.२०२६** रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील नोटीस बोर्डवर याबाबतची सुचना देण्यात याव्यात. तसेच सर्व विद्यार्थ्यांना नोटीस व्दारे वर्गात सुचना द्याव्यात तसेच सोशल मिडीयाव्दारे (WhatsApp, SMS) याबाबतची माहिती प्रसारीत करून विद्यार्थ्यांमध्ये प्रचार व प्रसिध्दी करावी. याबाबत आपण व्यक्तीशः लक्ष घालावे, जेणेकरुन इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील एकही पात्र विद्यार्थी या योजनेच्या लाभापासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

सुनिता नेर्लीकर
**सहायक संचालक,**
**इतर मागास बहुजन कल्याण,कोल्हापूर.**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर** :-
मा.प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग (प्रादेशिक) विभाग,पुणे.